सं.फौ.ख.क्र.७१३/२०२२
सरकार विरुध्द प्रज्वल
नि.क्र.७ पुढे सुरू

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५**
मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – क्षमा दादासाहेब माने,
वय – ४८ वर्षे, कामधंदा – महिला पोलीस हवालदार ब.नं.२०६९,
नेमणुक – पाचगणी पोलीस ठाणे.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती एस.आर. जाधव –**

दि.०९.०६.२०२२ रोजी मी वाई पोलीस ठाणे येथे महिला पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होते. त्या दिवशी माझी सकाळी ०९.०० ते संध्याकाळी ०९.०० या कालावधीत ठाणे अंमलदार म्हणुन पोलीस ठाणे वाई येथे डयुटी होती. मी अपराध क्र.२१३/२०२२ हा एमएलसी मधील जबाबावरून नोंदविला होता. तो जबाब शेशराव काशिनाथ जाधव यांचा होता व तो राखीव पोलीस ठाणे अंमलदार श्री डी.एस.यादव यांनी नोंदविला होता. ती एमएलसी दि.०८.०६.२०२२ रोजीची मिशन हॉस्पीटलची होती. त्या अनुषंगाने दि.९.०६.२०२२ रोजी सदरचा जबाब श्री यादव यांनी नोंदविला होता. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. तो **नि.क्र.१६** वर आहे. सदर गुन्हयाचे तपासकाम श्री डी.एस.यादव यांनी केले होते. मी आरोपीला पाहिले नव्हते. तसेच फिर्यादीला सुध्दा पाहणेचा योग मला आला नाही कारण ते फिर्याद नोंदवितेवेळी दवाखान्यात दाखल होते.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री बी.व्ही.लेंभे</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की दि.०९.०६.२०२२ रोजी फिर्यादी हा मिशन हॉस्पीटलमध्ये दाखल होता. एमएलसी वर फिर्यादी हा जबाब देण्यास सक्षम नसल्याबाबत शेरा असल्याचे मी सांगु शकत नाही कारण मी एमएलसी पाहिली नव्हती. आता मला खबरी जबाब दाखविण्यता आला. हे म्हणणे खरे आहे की त्यावर patient is conscious, oriented at present 09.06.2022 at 03.00 p.m. असा शेरा मारलेला आहे. (सदरील दस्त अभियोग पक्षातर्फे दाखल असल्याने व तो अभियोग पक्षाच्या साक्षीदारास

उलटतपासाच्या दरम्यान आरोपीतर्फे रेफर करण्यात आल्याने त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की नि.क्र.१७ मधील मजकुराबाबत मला वैयक्तीक माहिती नाही.

***उलटतपास पुर्ण***

***फेरतपास काहीही नाही.***

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

*स्वाक्षरी/-*

दि.२३.१०.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,